संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# शपथविधी आणि शस्त्रसंधीचा दिवस

**जगातील** सर्वात प्रबळ आणि प्रभावी राष्ट्र म्हणून अमेरिकेचे नाव घेतले जाते. स्वाभाविकपणे अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या प्रबळ राष्ट्राच्या अध्यक्षपदी कोणता प्रभावी अध्यक्ष विराजमान होतो याकडे सगळ्या जगाचे लक्ष लागलेले असते. डिसेंबर महिन्यात झालेल्या निवडणुकांमध्ये डोनाल्ड ट्रम्प पुन्हा विजयी झाले आणि आज त्यांचा अमेरिकेचे सत्तेचाळीसावे अध्यक्ष म्हणून शपथविधी होत आहे. निवडून आल्यानंतर त्यांनी हमासने ओलिस ठेवलेल्या इस्राईलच्या आणि इतर नागरिकांना २० तारखेपर्यंत मुक्त करावे अन्यथा गंभीर परिणामांना तयार राहावे, असा कडक इशारा दिला होता त्याचा योग्य तो परिणाम झाला. पुढच्या काही दिवसांतच हमासने इस्रायलबरोबर शांतता करार करण्याची तयारी दाखवली आणि तब्बल साठ सत्तर दिवस चाललेले इस्रायल पॅलेस्टाईन किंवा हमासविरुद्धचे युद्ध थांबलेले आहे. काही हजार लोकांचे बळी घेणार आणि दोन्ही बाजूने जवळपास चार हजार लोकांना ओलिस ठेवणारा हा युद्ध प्रकार जागतिक दृष्टीने अशांततेलाच आमंत्रण देत होता. हमास आणि इस्रायलमधला समझोताचा करार आजपासूनच प्रत्यक्षात अंमलात येतो आहे. आणि योगायोगाने आजच डोनाल्ड ट्रम्प यांचा शपथविधी होत आहे. जगाच्या दृष्टीने या दोन्ही घटना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेत असतानाच इस्रायल आणि हमासमधले युद्ध थांबावे म्हणजेच ही बाब डोनाल्ड ट्रम्पसाठीसुद्धा खूप मोठा संदेश देऊन जाते. जगाला शांततेचीच आवश्यकता आहे. आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकिर्दीची सुरुवात ही जर अशा शांतता कराराने होत असेल तर याच जागतिक शांततेचे महत्त्व त्यांच्या पुढच्या चार वर्षांच्या कारकिर्दीतही जपले जाणे आवश्यक ठरते. आज जगाला खऱ्या अर्थाने लोकशाही तत्त्वांची आवश्यकता आहे. अमेरिकेने नेहमीच लोकशाही धोरणाचा पुरस्कार केलेला आहे. मात्र बऱ्याच वेळेला अमेरिकेच्या स्वार्थाच्या आड येणाऱ्या राष्ट्रांविरुद्ध हुकूमशाही पद्धतीने निर्णय लादण्याचेही प्रकार अमेरिकेकडून अनेकवेळेला झाले आहेत.

### लोकशाही मूल्यांचे महत्त्व

आजचा हा दिवस जगाच्या दृष्टीने अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण ठरतो. डोनाल्ड ट्रम्प ज्या अमेरिकेच्या अध्यक्षपदाची शपथ घेत आहेत तिथे अध्यक्षीय लोकशाही पद्धत वापरली जाते. संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही यामध्ये निश्चितच थोडाफार फरक आहे. संसदीय लोकशाही राष्ट्रपती किंवा पंतप्रधानाला संसदेला अधिन राहूनच काम करावे लागते. त्या तुलनेत अमेरिकेच्या अध्यक्षाला निर्णय घेण्याचे बरेच स्वातंत्र्य दिले गेले आहे. परंतु जगात अधिकाधिक देशांमध्ये लोकशाही निर्माण व्हावी, सामान्य जनतेच्या न्यायहक्कांचे संरक्षण व्हावे, किंबहुना जगात कोणताही अतिरेक किंवा दहशत निर्माण करणारा हुकूमशहा निर्माण होऊ नये. असाच आग्रह लोकशाहीवादी राष्ट्र धरीत असतात. लोकशाहीचा भर हा सत्ताधाऱ्यांचा कमीत कमी हस्तक्षेप व्हावा आणि जनतेला मिळालेल्या हक्क आणि अधिकारांचा यावरच जास्त असतो. म्हणून भारतासारख्या संसदीय लोकशाहीवादी देशानेसुद्धा नेहमीच विश्वबंधुत्व, जागतिक शांतता किंवा 'युद्ध नको बुद्ध हवा' अशा प्रकारची धोरणे राबवून आपली भूमिका कायम ठेवलेली पाहायला मिळते. जगातल्या अनेक देशांना अमेरिकेकडे असलेले शस्त्र आणि संपत्तीचे बळ भीतीदायक वाटत आलेले आहे. म्हणूनच अमेरिका कोणत्यावेळी कसा निर्णय घेईल आणि कोणत्या देशाला कशा प्रकारे अडचणीत आणेल हे सांगता येत नसते. विशेषतः जी अविकसित आणि आकाराने छोटी राष्ट्रे आहेत. त्यांना अशा प्रकारचा धाक नेहमी वाटत असतो. अर्थात काहीवेळेला याच छोट्या राष्ट्रांना वेगवेगळ्या पद्धतीची मदतही होत असते. व्यापक अर्थाने आज एकूण जागतिक परिस्थितीचा विचार केला तर लोकशाही संरक्षणाची हमी हवी आहे. आणि जिथे जिथे संघर्ष सुरू आहे, ते लवकरात लवकर संपुष्टात यावेत. अशीच भावना प्रामुख्याने दिसून येत. या दृष्टीकोनातून एका मोठ्या लोकशाहीवादी राष्ट्राच्या अध्यक्षपदाचा शपथविधी आणि दहशतीचा वापर करणाऱ्या हमाससारख्या संघटनेने केलेली शस्त्रसंधी निदान यावर्षाची तरी चांगली सुरुवात म्हणता येईल. साधारणपणे एकाच दिवशी होत असलेला शपथविधी आणि दुसरीकडे होत असलेली शस्त्रसंधी याचे मूलभूत परिणाम लक्षात घेण्याची हीच वेळ आहे.

### कडाक्याच्या थंडीत शपथविधी

याच पद्धतीने जर पुढच्या कालावधीत रशिया आणि युक्रेन यांच्यातले युद्ध थांबले तर तीसुद्धा २०२५ या वर्षाची एक मोठी उपलब्धी ठरू शकेल. याबाबतही डोनाल्ड ट्रम्प नेमकी काय भूमिका घेतात याकडेसुद्धा जगाचे लक्ष राहील. अमेरिकेने सुरुवातीपासूनच युक्रेनला सहाय्य करण्याची भूमिका घेतलेली आहे. अमेरिका आणि रशिया यांच्यातले शत्रुत्वदेखील जगजाहीर आहे. आता एक महासत्ता दुसऱ्या महासत्तेला कशा पद्धतीने नमवते किंवा समजूत घालते. हे पाहणेदेखील मोठे औत्सुक्याचे ठरू शकेल. जागतिक स्तरावर सगळेच देश आपापले परराष्ट्र व्यवहार अधिक चांगले व्हावेत असाच प्रयत्न करतात. अमेरिका आणि रशियात जरी शत्रूत्व असले तरी व्यापार उद्योग किंवा तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीचा परराष्ट्र व्यवहार योग्य पद्धतीने सुरूच राहिला आहे. रशियाने युक्रेनसारख्या छोट्या राष्ट्रावर आता अधिक जुलूम जबरदस्ती करण्याची गरज नाही. गेले वर्षभर सुरू असलेले युद्ध दोन्ही देशांनाही योग्य तो धडा देऊन गेले आहे. रशिया हे बऱ्याच बाबतीत प्रभावशाही ठरते. परंतु जागतिक शांतता आणि एकूणच लोकशाही मूल्यांचा पुरस्कार विशेषतः सामान्य माणसाच्या जनजीवनाची सुरक्षितता म्हणजेच निष्पापांचे अनाठायी बळी घेण्याची आसूरी महत्त्वाकांक्षा थांबणे आवश्यक ठरते. अत्यंत कडाक्याच्या थंडीत अमेरिकेच्या अध्यक्षांचे होत असलेले हे शपथग्रहण भविष्यकाळात जागतिक स्तरावर कोणाला हुडहुडी भरवते. ही एकूणच सलोख्याचे ऊबदार परराष्ट्र धोरण राबवते यावर बरेच काही अवलंबून असेल. याचवेळी तिथे होत असलेली ट्रम्पविरोधाची निदर्शनेसुद्धा दुर्लक्षित करता येत नाहीत. भारतासाठी कोणीही अध्यक्ष झाला तरी ते संबंध टिकवले जातात. आजदेखील त्यांच्या शपथविधी कार्यक्रमात मराठी बाणा दाखवणारा ढोल-ताशांचाही गजर होणार आहे.